# महिला सक्षमीकरण : सद्यस्थिती व उपाय

सौ.अनिता राजेंद्र पाटील
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**प्रस्तावना :**

मानवाच्या असितत्वापासून स्त्री आणि पुरूष हे दोन परस्पर पूरक घटक अस्तित्वात आहेत. दोन्ही घटक परस्पर पूरक असून देखील महिलांना बहुतांश ठिकाणी अद्यापही समानतेचा दर्जा प्राप्त झालेला नाही. त्यांना पुरूषप्रधान संस्कृतीत कायमच अबला समजून दुय्यम स्थान दिलेले आहे महिला या केंव्हाही अबला नव्हत्या व नाहीत. भारतीय संस्कृतीत महिलांना उच्य व वंदनीय स्थान असून देखील समानतेच्या आधारावर शैक्षणिक, सांपत्तिक, अधिकार इत्यादी विकासाच्या संधी प्राप्त झालेल्या नाहीत पर्यायाने त्यांचे पूर्णतः सबलीकरण होऊ शकले नाही.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये एकूण लोकसंख्येच्या साधारण ५० प्रतिशत महिलांचे प्रमाण असून देखील त्यांना योग्य तो सत्तेत वाटा व विकासाकरिता शिक्षण न मिळाल्यामुळे त्या अज्ञानीच राहिल्या आहेत. सारासार विचार करता महिलांमध्ये अधिकचे कौशल्ये, शैक्षणिक आकलन क्षमता असुनही त्यांना योग्य संधी प्राप्त होत नाहीत. त्याचबरोबर, तुलनात्मक दृष्टीने पाहिले असता ग्रामीण भागातील महिलांपेक्षा शहरी भागातील महिलांना अधिकच्या संधी उपलब्ध होताना दिसतात. हा विरोधाभास देखील दूर होणे आवश्यक आहे.

भारत तसेच आंतरराष्ट्रीय समुदायाने महिलांच्या व सक्षमीकरण याकरिता आपापले अनेक नियम व कायदे अस्तित्वात आणले आहेत. जेणेकरून महिलांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात त्यांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांचे सक्षमीकरण व्हावे हा त्या मागील मुख्य उद्देश आहे.

**महिला सबलीकरण :**

महिला सबलीकरणाचा अर्थ म्हणजे त्यांना स्वावलंबी बनविणे. महिलांना सबल करणे म्हणजेच तिची दुर्बलता नष्ट करणे. तिचे शरीर, मन, बुध्दी, स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागरूकता निर्माण करून त्यादृष्टीने स्वयम् विकासासाठी प्रयत्न करणे होय. ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये महिलांचे सबलीकरण म्हणजे त्यांना नैसर्गिक कायदेविषयक नैतिक अधिकार देणे होय. थोडक्यात महिला सबलीकरण म्हणजे त्यांना त्यांच्या विकासासाठी स्वातंत्र्याची समान संधी असणे होय. महिला सबलीकरण म्हणजे पुरूषांना हिणवणे किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ सिध्द करणे असे नव्हते तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म क्षमता परंपरा यांच्यासह समानतेने वागवणे होय. असा विचार प्रवाह समाजात प्रस्थापित झाला तरच खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल. स्त्रीशक्तीच्या स्वरूपात देशात असलेले

मनुष्यबळ विकसित करून स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वावलंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तरच समाजात सुराज्य दिसेल. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनविण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्वाचे ठरेल. महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य घेण्याचा अधिकार मिळणे होय. महिला या देशाचे भविष्य ठरवणारी शक्ती आहे आणि त्यामुळेच ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे.

समाजात स्त्रीची कितपत प्रगती झाली आहे यावरून त्या संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आलेख ठरतो. महिलांच्या सबलीकरणासाठी अस्तित्वात असणारे कायदे गरजवंत स्त्रियांपर्यंत पोहोचतात का ? किंबहुना या कायद्याबाबत तिला माहिती आहे का ? असे अनेक गहन प्रश्न आहेत.

**'नारी नही चिंगारी तू, अबला नही सबला तू,**
**बदल देखी छबी देश की, विकास की ऐसी गंगा तू'**

**ग्रामीण महिलांचे सबलीकरण :**

ग्रामीण महिलांना त्यांचे मूळ ज्ञान कौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महिलांनी छोटे छोटे उद्योग व्यवसाय सुरू करून त्या उद्योगाचे रूपांतर मोठ्या उद्योगांमध्ये झालेले अनेक उदाहरण आहेत. ग्रामीण महिलांचे कौटुंबिक आणि समाजातील योजनांमध्ये सिंहाचा वाटा आहे. परंतु असे असले तरी त्यांना विकासाच्या संधी मध्ये अतिशय अल्प वाटा मिळतो. बहुतेक वेळा त्यांना शिक्षण, चांगली नोकरी, राजकीय व्यवस्थेत सहभाग आणि चांगली आरोग्य सेवा यामध्ये निर्णय घेण्यापासून वगळले जाते. त्याशिवाय त्यांना शारीरिक, मानसिक, सामाजिक अणि सांस्कृतिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो की जे त्यांच्या सक्षमीकरण यात अडचण निर्माण करतात. भारत शासनाने स्त्री व पुरूष यांच्यामधील दरी कमी करण्याकरता रणनिती ठरवली. १६५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टिकोन कल्याण होता तर १६७० च्या सुमारास विकास झाला व १६८० पासून सबलीकरण हा दृष्टिकोन झाला.

ग्रामीण महिला या दारिद्र्यरेषेखाली अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत जीवन जगत असतात. ग्रामीण महिलांच्या एकत्रिकरणासाठी आणि सेवा एकत्रित करण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत उपायांसह अनेक आर्थिक आणि सामाजिक पर्यायांची संधी देऊन त्यांच्यासाठी पावले उचलली गेली. स्त्रिया व्यापार आणि उत्पादनासाठी पतपुरवठ्यात प्रवेश करण्यासाठी अस्तित्वात असलेला सुक्ष्म पत यंत्रणा आणि बचत गटांचा सूक्ष्म वित्त संस्थांची नवीन स्थापना आणि बळकटीकरण अधीच कार्यरत आहे. अस्तित्वात असलेल्या वित्तीय संस्था आणि बँकांद्वारे कर्जाचा पुरेसा प्रवाह सुनिश्चित व्हावा यासाठी इतर आधारभूत उपाययोजना केल्या जातात. जेणेकरून दारिद्र्यरेषेखालील सर्व महिलांना सहज पतपुरवठा होऊ शकेल. अशा प्रक्रियेत त्यांचा सहभाग असतो. अर्थशास्त्रीय आणि सामाजिक धोरणांची आखणी करून अंमलबजावणी करताना महिलांच्या दृष्टिकोनाचा

समावेश केला जाईल. उत्पादक आणि कामगार म्हणून समाजिक आर्थिक विकासासाठी त्यांचे योगदान अैपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रात ओळखले जाईल आणि नोकरी आणि तिच्या कामकाजाच्या परिस्थिती संबंधित योग्य धोरणे तयार केली जातात. हे लक्षात घेतले जाते की जागतिकिकरणाने महिलांच्या समानतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन आव्हाने सादर केली आहेत. त्यातील लैंगिक परिणमांचे पध्दतशीरपणे संपूर्ण मुल्यांकन केले नाही तथापि महिला व बालविकास विभागाने सुरू केलेल्या सूक्ष्म स्तरीय अभ्यासानुसार हे स्पष्ट आहे की रोजगार आणि रोजगाराच्या गुणवत्तेसाठी नूतनीकरण धोरणांची गरज आहे. वाढत्या जागतिकिकरणाचे फायदे असमान पध्दतीने वाटले गेले आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक समानता वाढली आहे.

**महिलांसाठीचे विविध कायदे :**

महिलांच्या सबलीकरणासाठी व हक्कासाठी वेळोवेळी अनेक कायदे तयार करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने हुंडा प्रतिबंधक कायदा, महिला संरक्षण कायदा, संपत्ती समान हक्क अधिकार, लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, प्रसूती रजा संबंधित कायदा, महिलांच्या विकासासाठी योजना, नोकरदार महिलांसाठी योजना, किशोरवयीन मुलींसाठी योजना, मानवी व्यापार प्रतिबंध, महिला सन्मानासाठी पुरस्कार इत्यादी कायदे अस्तित्वात आहेत.

**महिला सक्षमीकरण उपाय :**

- महिलांचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास वाढवणे.
- महिला आणि मुलींवरील भेदभाव आणि सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे उच्चाटन करणे.
- नागरी समाज विशेषतः महिला संघटनांसोबत भागीदारी निर्माण करणे आणि मजबूत करणे.
- समाजात महिलांची सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे आणि सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान ओळखणे.
- महिलांमध्ये गंभीरपणे विचार करण्याची क्षमता विकसित करणे.
- निणर्य घेण्याची आणि सामूहिक कृतीला चालना देणे.
- महिलांना माहितीपूर्ण निवडी करण्यास सक्षम करणे.
- जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग सुनिश्चित करणे.
- स्वयंरोजगारासाठी माहिती, ज्ञान, कौशल्ये प्रदान करणे.

**निष्कर्ष :**

आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर असताना दिसून येतात त्या ज्या खुबीने घर चालवतात त्याच खुबीने त्यांचे कर्तव्य देखील बजावतात मग ते विमान उड्डाण असो की एखाद्या बँकेचे, शाळेचे व्यवस्थापन असे त्या यशस्वीपणे चालवू शकतात. आज घडीला महिला या उद्योग जगतात देखील अग्रेसर असल्याचे दिसून येते. एकंदरीतच एकविसावे शतक हे महिलांच्या उन्नतीसाठी व विकासासाठी महत्त्वाचे राहिले आहे. आधुनिक भारताला

महिलाही ज्ञान-विज्ञानाच्या संगतीने देशाला प्रगतीपथावर घेऊन जाणार यात काही शंकाच नाही परंतु ह्या सृष्टीच्या जननीला या जगामध्ये मनाचे स्थान पाहिजे त्या प्रमाणात आज देखील मिळालेले नाही. त्या आज विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत जरी असल्या तरी तिची बहुतांश ठिकाणी अवहेलना होताना दिसून येते. कौटुंबिक बाबतीत देखील सर्वत्र तिला समान वागणूक मिळणे आवश्यक आहे. राज्यघटनेनुसार स्त्री-पुरूष समानतेचा अधिकार असताना देखील समाजातील विविध प्रथा परंपरेला तिला सामोरे जावे लागते. महिला सक्षमीकरण करून तिचा सर्वांगिण विकास करण्यासाठी तिच्यावरील होणाऱ्या अन्यायाला दाद मिळणे आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांनी याकडे काळजीपूर्वक पाहणे आवश्यक आहे. शासनाने जरी महिलांची होणारी अवहेलना, अन्याय अत्याचार, असामानतेची वागणूक यासाठी वेगवेगळे कायदे अस्तित्वात आणले आहेत परंतु त्यासाठी त्या कायदा हक्क व अधिकार याची तिला जाणीव करून देणे व संरक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपण सर्वांनी महिलांच्या मानवी हक्क कायद्याचे हनन होणार नाही यासाठी आपण सर्व कटिबध्द राहून प्रयत्नशिल असले पाहिजे त्यामुळे तिच्या विकासासोबत कुटुंब राज्य व देशाचा विकास विकासास हातभार लागून प्रगती साधता येईल.

**समारोप :**

महिलांना त्यांचे हक्क व कायद्याने दिलेले कायदेविषयक नैसर्गिक अधिकार यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास त्यांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात त्यांना समान संधी उपलब्ध होऊ शकतील व त्यांच्या सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा होईल.

**संदर्भ :**

१) सीमा सिंग, अंतरा सिंग (२०२०), भारतीय महिला सक्षमीकरण : एक गंभीर विश्लेषण, तथापि, खंड १६ (१४), २२७-२५३.

२) अशोक देवकर, (२०२०), ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण : एक आढावा, JETIR , खंड ७.

३) दयाराम पवार, (२०२१), शिक्षण व महिलांचे कायदेविषयक हक्क, बी. आधार, खंड २७६, १०१-१०४.

४) उमेशकुमार शहरे, (२०२१), मानवी हक्क आणि महिला विकास, रिसर्च हब, खंड २ (१), ६८-७१.

५) अनिल देशमुख (२०१८), महिला सबलीकरण संकल्पना व स्वरूप, Chronicle of Humanities and Cultural Studies खंड ४ (१), ४३-४५

***